।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव Formerly North Maharashtra University,Jalgaon)

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4 th Cycle)




**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

जा.क्र. : कबचौउमवि/७-अ/दी.स.-३४/४०८९/२०२५ दिनांक : १०/१२/२०२५

प्रति,
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र**
**विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य तसेच**
**मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक........**

**विषय:- कबचौउमविच्या चौतीसाव्या दीक्षांत समारंभाविषयी माहिती व अहवाल सादर करणेबाबत .....**

महोदय/महोदया,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा चौतीसावा दीक्षांत समारंभ **मंगळवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२५ रोजी माननीय श्री. आचार्य देवव्रत, राज्यपाल (महाराष्ट्र राज्य) तथा कुलपती, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव** यांच्या अध्यक्षतेखाली आणि **मा. प्रा. विजय ल. माहेश्वरी, कुलगुरू, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव** यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात येणार आहे. या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून **मा. प्रा. गणेशन कन्नबीरन , संचालक , राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद (NAAC) बेंगलोर** हे उपस्थित राहणार असून, दीक्षांत भाषण करणार आहेत.

विद्यापीठाच्या चौतीसाव्या दीक्षांत समारंभाविषयीची संपूर्ण माहिती विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यांत येत आहे. सदर दीक्षांत सोहळ्याचे थेट प्रक्षेपण **मंगळवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून समारंभ संपेपावेतो** विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावरुन प्रक्षेपित करण्यांत येणार असून, त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, हे प्रक्षेपण आपण आपल्या महाविद्यालयातील/ परिसंस्थेतील विद्यार्थ्यांना एका सभागृहात एकत्रित करुन दाखवावे. तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभागास ०८ दिवसांच्या आंत विद्यापीठास सादर करावा, ही विनंती.

तरी उपरोक्त संदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

**आपला विश्वासू,**

**( प्रा. योगेश ना.पाटील )**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**